शालेय पोषण आहार योजनेंतर्गत खर्चाचे सुधारीत दर (सन २०१४-१५) लागू करणेबाबत.

## महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः शापोआ-२०१३/प्र.क्र.२१५/वि.वि.-३

मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २८ ऑक्टोबर, २०१४

**वाचा -**

१) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना २००६.
२) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. शापोआ- २०१०/प्र.क्र.१८/प्राशि-४, दि.२/२/२०११
३) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.शापोआ-२०१३/प्र.क्र.२१५/वि.वि.३, दि. ०६/१२/२०१३
४) केंद्र शासनाचे पत्र क्र. F.No. १-१/२००९-Desk (MDM) दि. ०६/०६/२०१४
५) शिक्षण संचालक (प्राथ.) यांचे पत्र क्र. प्राशिस/शापोआ/२०१४-१५/३०१/३२९९, दि.१३/०६/२०१४

**प्रस्तावना -**

राज्यामध्ये शालेय पोषण आहार (Mid Day Meal) ही योजना इ. १ ली ते ८ वी च्या विदयार्थ्यांसाठी राबविण्यात येते. या योजनेंतर्गत इ. १ ली ते ५ वी या प्राथमिक वर्गातील प्राथमिक विदयार्थ्यांसाठी ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने युक्त तसेच इ. ६ वी ते ८ वी या उच्च प्राथमिक वर्गातील विदयार्थ्यांसाठी ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने युक्त आहार देण्यात येतो. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्रतिदिन प्रतिविदयार्थी प्राथमिक वर्गासाठी १०० ग्रॅम आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी १५० ग्रॅम तांदूळ पुरविण्यात येतो. या तांदूळापासून शालेय पोषण आहार तयार करण्यासाठी संदर्भाधिन दि. ०६/१२/२०१३ च्या शासन निर्णयान्वये अन्न शिजविण्याच्या दरासाठीची (Cooking Cost) प्रति दिन प्रति लाभार्थी आहार खर्च मर्यादा प्राथमिक वर्गासाठी (१ ली ते ५ वी) रु.३.३४/- आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी (इ. ६ वी ते ८ वी) रु. ५.००/- त्याप्रमाणे निश्चित करण्यात आलेली होती. केंद्र शासनाने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षापासून सदर खर्च मर्यादेत ७.५%

दरवाढ मंजूर केली असून त्यानुसार संदर्भाधिन दि. २/२/२०११ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार सदर दरवाढ लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्र शासनाचा हिस्सा आणि राज्य शासनाचा हिस्सा यामधील खर्चाचे प्रमाण ७५:२५ असे राहील. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत प्राथमिक तसेच उच्च प्राथमिक वर्गातील विदयार्थ्यांना खालीलप्रमाणे आहाराचा पुरवठा करण्यास तसेच त्यासाठी सुधारित दरास मान्यता देण्यात येत आहे.

| लाभार्थी | आहाराचे प्रमाण | प्रति दिन प्रति लाभार्थी आहार खर्च मर्यादा | प्रति दिन प्रति लाभार्थी आहारासाठी दर |
|---|---|---|---|
| प्राथमिक (१ ली ते ५ वी) | ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार (मध्यान्ह भोजन) | ३.५९/- | ३.५/- |
| उच्च प्राथमिक (६ वी ते ८ वी) | ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार (मध्यान्ह भोजन) | ५.३८/- | ५.२०/- |

२. शालेय पोषण आहाराच्या प्रति दिन प्रति लाभार्थी खर्च मर्यादेमधून प्राथमिक गटामधून ९ पैसे आणि उच्च प्राथमिक गटामधून १८ पैसे प्रति दिन प्रति लाभार्थी असा निधी शालेय पोषण आहार योजनेसाठी लागणारे विविध साहित्य आणि साधन सामग्री, सूक्ष्मपोषण इत्यादी बाबींसाठी राहील.

३. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ग्रामीण भागामध्ये तांदुळाबरोबरच इतर धान्यादी मालाचा पुरवठा शाळेमध्ये करण्यात येतो. या धान्यादी मालापासून आहार बनविण्यासाठी प्राथमिक आणि उच्च प्राथमिक लाभार्थ्यांसाठी निश्चित करण्यात आलेल्या आहार खर्चाची विभागणी खालीलप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ग्रामीण भागातील आहार खर्चाची विभागणी**

| लाभार्थी | अनुज्ञेय आहार खर्च | धान्यादी माल पुरविण्यासाठी खर्च | इंधन आणि भाजीपाला यासाठी लागणारा खर्च |
|---|---|---|---|
| प्राथमिक | रु. ३.५०/- | रु. २.१९/- | रु. १.३१/- |
| उच्च प्राथमिक | रु. ५.२०/- | रु. ३.५६/- | रु. १.६४/- |

४. या योजनेमध्ये शहरी भागामध्ये म्हणजे महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रामध्ये स्वयंसेवी संस्था / बचत गट यांचेमार्फत शिजवलेल्या तयार आहाराचा पुरवठा शाळांमध्ये विदयार्थ्यांना करण्यात येतो. शहरी भागात केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा वापर करुन तयार आहाराचा पुरवठा करण्यात येत असल्याने शहरी भागामध्ये शालेय पोषण आहार पुरवठा करणाऱ्या यंत्रणेस खालीलप्रमाणे आहार खर्चाचे अनुदान अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| लाभार्थी | अनुज्ञेय आहार खर्च (रु.) | तयार आहाराचा पुरवठा करणाऱ्या यंत्रणेस अदा करावयाचे अनुदान (रु.) |
|---|---|---|
| प्राथमिक | रु. ३.५०/ | रु. ३.५०/ |
| उच्च प्राथमिक | रु. ५.२०/ | रु. ५.२०/ |

५. सदरचे सुधारित दर दि. ०१/०७/२०१४ पासून लागू राहतील.

६. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५५४/व्यय-५, दिनांक १३/०८/२०१४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४१०२८१२५२२३६४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KAMBLE GOVIND B

Digitally signed by KAMBLE GOVIND B
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=KAMBLE GOVIND B
Date: 2014.10.28 14:36:22 +05'30'

**(गोविंद कांबळे)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधानसचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री/मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण, यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५. मा.सचिव (शा.शि.व क्री.वि.), मंत्रालय, मुंबई

६. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
७. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
८. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
११. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), सर्व जिल्हे
१२. सर्व शिक्षणाधिकारी /प्रशासन अधिकारी, सर्व महानगरपालिका/नगरपालिका
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र ½, मुंबई/नागपूर
१४. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र ½, मुंबई/नागपूर
१५. सर्व मुख्य लेखा परीक्षक
१६. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. शालेय शिक्षण विभाग (अर्थसंकल्प)
१९. निवड नस्ती , विवि-३